**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५९ दिनांक ०६ / ०७ / २०१७

**विषय :** म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कार्यरत असलेल्या गणवेष पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या धुलाई भत्त्याच्या दरामध्ये वाढ करणेबाबत.

--------

पुर्वीच्या म.रा.वि.मंडळातील व तदनंतर मंडळाच्या विभाजनानंतर कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांना गणवेष पुरविण्यात आला आहे, त्यांना धुलाई भत्ता देण्याबाबतची तरतूद सा.आ.क्र. ९८(क) दि.२३.०९.१९८० अन्वये करण्यात आलेली आहे. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. ११८ दि. २३.०८.२००७ अन्वये सदर धुलाई भत्त्याचे दर रु. ६०/- (रु. साठ फक्त) दरमहा या दराने सुधारीत करण्यात आलेले आहेत. सद्यपरिस्थितीत सर्व गणवेष पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या धुलाई भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांचेशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीतील सर्व गणवेष पात्र कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या धुलाई भत्त्याच्या विद्यमान दरामध्ये वाढ करुन दरमहा रु. ६०/- (रु. साठ फक्त) ऐवजी दरमहा रु. १००/- (रु. शंभर फक्त) अशा सुधारीत दराने धुलाई भत्ता देण्यास मान्यता दिली आहे.

३. सदर सुधारीत धुलाई भत्त्याचे दर हे माहे जुलै-२०१७ पासून अंमलात येतील व हे सुधारीत दर पुढील ५ वर्षाकरिता स्थिर राहतील.

४. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, कंपनीतील गणवेष पात्र कर्मचाऱ्यांनी कामावर असतांना गणवेष परिधान करणे आवश्यक असतांनाही बरेचशे कर्मचारी गणवेष परिधान करीत नाहीत. सबब, सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांना सूचीत करण्यात येते की, महावितरण कंपनीतील सर्व गणवेष पात्र कर्मचारी यांनी स्वच्छ व नीटनेटका गणवेष कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत परिधान करावा या दृष्टीकोनातून विहीत नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

६/७
(संदेश हाके) ६/७
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)